# प्रेस नोट दिनांक १०/०४/२०१९

## फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

### सराफ व्यापारास फसविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

महाराष्ट्रात अनेक सराफ व्यापाऱ्यांना फसविणाऱ्या टोळीस फरासखाना पोलीस स्टेशन येथे अटक केली असता, त्यांच्याकडुन तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. सदर गुन्ह्यांमध्ये ८०० ग्रॅम सोन व दागिने असा एकुण २८ लाख रुपयांचा माल हस्तगत केला आहे.

मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, पुणे यांच्याकडे दिनेश ओसवाल यांनी तोंडी तक्रार केली होती. त्यांना प्रितम नावाच्या व्यक्तीने सोन्याचे दगिन्यांची ऑर्डर देवुन, त्याबदल्यात सोन्याचे बिस्कीट घेण्याचा व्यवहार झाला. त्यास सिंहगड रोड येथे बोलावुन एका कार मध्ये ते दागिने ठेवण्यास सांगुन, तेथुन सोन्याचे बिस्कीट घेवुन जाण्यास सांगितले. त्या बिस्कीट दिनेश ओसवाल यांनी विश्वासाने दुकानात आणुन ठेवले. काही दिवसांनी ते नाणे चेक केले असता ते सोन्याचे नसुन एक ग्रॅमच्या सोन्याचा मुलामा देवुन, तांबे वापरुन बनविलेले होते.

मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, पुणे यांनी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन तात्काळ फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करणेबाबत आदेश दिला. फिर्यादी दिनेश ओसवाल, वय ४२ वर्षे, रा. कोंढवा, पुणे यांच्या फिर्यादीवरुन फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. १२५/२०१९ भा.द.वि. कलम ४०६,४२० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी दिनेश ओसवाल यांनी सांगितले की, आरोपी प्रितम भळगट ऊर्फ ओसवाल यांनी सोन्याचे दागिने बनवुन पाहिजे त्याबदल्यात सोन्याचे बिस्कीट देतो असे फिर्यादी व आरोपी यांचे फोनवर व्यवहार झाला व ४१८ ग्रॅम सोन्याचे अंगठी, पेंडंट, टॉप्स, असे दागिने तयार केले. दि. २९/०१/२०१९ रोजी फिर्यादी यांनी दागिने तयार झाले आहेत ते घेवुन जा असे सांगितले. त्यावरुन आरोपी प्रितम ओसवाल याने सांगितले की, "माझी पत्नी बाहेरगावी गेली आहे. ती सायंकाळी ७ वाजता. संतोष हॉल सिंहगड रोड, पुणे येथे गाडीसह येणार आहे. तिच्याकडे सोन्याचे दगिने द्या." त्याप्रमाणे फिर्यादी हे संतोष हॉल सिंहगड रोड, पुणे येथे दागिने देण्याकरीता गेले असता, आरोपी प्रितम भळगट ऊर्फ ओसवाल याने सांगितले की, "सदरचे सोने पत्नी दुकानात गेल्याचे सांगुन, माझ्या गाडीचे ड्रायव्हरला औषधाचा बॉक्स सांगुन द्या." त्याप्रमाणे फिर्यादी यांनी सोन्याचे दागिन्यांचा बॉक्स ड्रायव्हर कडे देवुन, सोन्याचे बिस्कीट असलेला बॉक्स ड्रायव्हर कडुन घेतला. ते बिस्कीट काही दिवसांनी चेक केले असता, ते पितळी असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर आरोपीस फोन केला असता, त्यांचा फोन बंद होता. सदर घटनेबाबत आरोपी संदर्भातील माहिती फिर्यादी यांनी घेतली असता, याच पध्दतीने १) अनिल बी. पामेचा, रा. मुंबई २) प्रकाश एफ सेमलानी रा. मुंबई ३) गौतम परमार रा. गुरुवार पेठ, पुणे यांचीही फसवणुक केल्याचे समजले.

मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि किशोर नावंद, पोउपनि सुर्यवंशी व त्यांच्या सहकारी यांनी तपासाचे चक्र फिरवुन, प्रथमतः आरोपी वापरीत असलेला मोबाईल नं. ७८८१५८९४३ याच्यावरुन आरोपीचा शोध घेण्यास सुरवात केली. सदरचे

सिमकार्ड हे एका नेपाळ्याकडुन ५० रुपयास विकत घेतले होते. त्यावरुन त्याच्या आय.एम.ई.आय. चा सी.डी.आर. काढला असता, त्यावरुन त्यास दुसरे सीमकार्ड ट्रेस झाले. सदर सिमकार्ड हे आरोपी याने शांती हॉटेल सिंहगड रोड येथील एका वेटरकडुन त्याच्या भावाला नोकरी लावण्याच्या आमिषाने घेतले होते. परंतु ते त्याला परत न करता त्यावरुन त्याने ते इतर गुन्हे करण्यात वापरले. त्या वेटरच्या भावाचा शोध घेतला असता, त्याने सदरची हकीकत सांगितली. त्यावरुन मा. सुहास बावचे त्यांचे कार्यालयातील स्टाफ व फरासखाना पोलीस स्टेशनकडील स्टाफ यांना सदर इसमाचा शोध घेण्याबाबत आदेश दिला. त्यावरुन त्या वेटरचा शोध घेतला. त्याचेकडुन आरोपीची माहिती व वर्णन प्राप्त करुन घेतले. आरोपी प्रितम याचा शोध घेत असताना तो मिळुन आल्याने त्यास दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. आरोपी प्रितम अटकेत असताना त्याच्याकडे चौकशी केली. तो अतिशय चालाख हुशार आहे. त्याने सुरवातीस उडवाउडवीची उत्तरे दिली. नंतर त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. त्याच्याकडे गुन्ह्याबाबत सविस्तर विचारपुस करता, तो त्याचे साथीदार १) नितीन दलीचंद ओसवाल रा. इस्लामपुर, २) विलास माणिक खामकर रा. इस्लामपुर, ३) महेश मोहन पाटील रा. कोल्हापुर यांनी मिळुन सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले. गुन्हा कशापध्दतीने केला त्याची सविस्तर हकीकत प्रितम याने सांगितले. आम्ही गुगल ॲप वरुन सोन्याचे व्यापाऱ्यांचे मोबाईल नंबर घेवुन, त्या नंबरवर फोन करुन, सोन्याचे दागिन्यांची ऑर्डर देताना त्या दागिन्यात खड्याचा किंवा मन्याचा उपयोग जास्त होतो. अशा दागिन्याची ऑर्डर देणार, कारण त्या ऑर्डरमध्ये व्यापाऱ्यांचा जास्त फायदा होत असे. या अशेपोटी व्यापारी व्यक्ती समोर नसतानाही सोन्याचे बिस्कीटे बदल्यात दागिने तयार करुन देण्यास तयार होत असे. आरोपी हे प्रथम जस्ट डाईल वरुन कार बुक करणार त्यास विशिष्ट ठिकाणी त्या व्यापाऱ्यास बोलावणार व तेथे गाडीचा ड्रायव्हर आला की, त्या आरोपी पैकी एक जण स्कुल बॅग गाडीत ठेवणार व ड्रायव्हर यास मालक कामात आहेत येणार आहे असे सांगुन निघुन जाणार. त्यानंतर व्यापायाचा फोन आला की, त्यास त्या गाडी नंबर देणार व सांगणार मला दवाखान्यात वेळ लागणार आहे. त्यास गाडी नंबर देवुन त्या गाडीच्या बॅगमध्ये बिस्कीट ठेवली आहे. ते घेवुन जा व दागिन्यांचा बॉक्स ड्रायव्हरकडे औषधाचा बॉक्स आहे असे सांगुन देण्यास सांगत व ड्रायव्हरला पण वरील प्रमाणे माहिती देत असे, ड्रायव्हर बॅगमधील सिलबंद बॉक्स व्यापारास देणार व व्यापाऱ्याकडुन औषधाचा बॉक्स घेवुन बॅगमध्ये ठेवायचा. थोडया वेळानंतर ड्रायव्हरला फोन करुन विशिष्ट ठिकाणी बोलावुन त्यास एक जण गाडी आडवुन बॅगेमध्ये काय आहे. याचा विचारपुस करुन, ती बॅग काढुन घेणार अशा पध्दतीने सोन्याचे दागिने लंप्पास करीत असत. व दुसरी पध्दतीने व्यापाऱ्यास फोन वरुन दागिन्यांची ऑर्डर देवुन तो माल आंगडीया मार्फत मागावुन घेणार तो बॉक्स आला की, दागिन्यांचा बॉक्स घेवुन खोटया बिस्कीटांचा बॉक्स त्यास देवुन व्यापायाच्या पत्त्यावर पाठवणार अशा पध्दतीने या टोळींनी आता पर्यंत अनेक ठिकाणी गुन्हे केले आहेत.

आता पर्यंत आपल्याकडे तिन्ही गुन्हे दाखल आहे. फरासखाना पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं १२५/२०१९, खडक पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा रजि. नं.१९३/२०१९ तसेच मुंबई मधील लोकमान्य टिळक मार्ग पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. १२९/२०१९ असे गुन्हे दाखल आहेत. आरोपी यांनी तिन्ही गुन्हे केल्याचे कबुल करुन तिन्ही गुन्ह्यात एकुण ७.४२ ग्रॅमचे सोन्याचे दागिन्यांचा विश्वासघात करुन घेतले होते. ते त्यांच्याकडुन हस्तगत केले आहेत. मुख्य आरोपी प्रितम ओसवाल (भळगट) हा असुन, यापुर्वी त्याने खोटा चेक देण्याचे प्रकारणात तीन महिन्यांची शिक्षा झाली आहे. इतर आरोपी पण क्रिकेट मटका जुगार खेळयाची सवयीचे आहेत. तरी अधिक तपास करीत आहोत.

सदर कार्यवाही मा.रविंद्र सेनगावंकर, अपर पोलीस आयुक्त सो, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, पुणे शहर, प्रदीप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, फरासखाना विभाग, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे., वाय पी सुर्यवंशी पोलीस उप निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे पोहवा ५७४८ सचिन इनामदार, महेश साळुंके, सुरेंद्र जगदाळे, पोशि गायकवाड
पो.ना. पालवे यांनी आरोपीचे वर्णन प्राप्त करुन शोध घेतला. पोहवा ५७४८ इनामदार, पोलीस हवालदार बापु खुटवड, नाना भांदुर्गे, अमेय रसाळ, हर्षल शिंदे, महावीर वल्टे, अमोल सरडे यांचे पथकाने केलेली आहे.

